30 NOV 2021

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी विद्यापीठ प्रयत्नशील

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के ; विद्यापीठात एकदिवसीय मेळावा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

क्रीडापटूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रीडाकौशल्य विकास आणि करिअरच्या संधी, सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात, यासाठी शिवाजी विद्यापीठ प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : विद्यापीठात क्रीडा अधिविभागाच्या एकदिवसीय मेळाव्यात बोलताना कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के. डॉ. पी.टी. गायकवाड, प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, अॅड. धैर्यशील पाटील, संजय जाधव, डॉ. व्ही.एन. शिंदे. (छाया : पप्पू अत्तार)**

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय मेळाव्यामध्ये अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरू डॉ. पी.एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य अॅड. धैर्यशील पाटील, संजय जाधव प्रमुख उपस्थित होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ सक्षमपणे क्रीडापटूंच्या पाठीशी उभे राहिले तर त्यांच्या गुणवत्तेत व यशामध्ये भरीव वाढ होईल, या अपेक्षेतून विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्याची भूमिका प्रशासनाची आहे. प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, केवळ ऑलिम्पिकसाठी म्हणून मुलांना वयाच्या सातव्या वर्षापासून प्रशिक्षित करणाऱ्या चीनसारख्या देशांशी आपली स्पर्धा आहे. त्यांच्याशी स्पर्धा करावयाची तर तशी कार्यप्रणाली, पायाभूत सुविधा आणि तयारी विकसित करावी लागेल.

संजय जाधव म्हणाले, खेळाडूंसमोरील अडचणी सोडविण्यासाठी विद्यापीठ सकारात्मक आहे. खेळाडूंच्या अनेक अपेक्षा आहेत. त्यांची पूर्तता करण्यासाठी प्रयत्नशील आहोत. याप्रसंगी कुलगुरूंसह सर्वच मान्यवरांनी तासभर क्रीडापटूंच्या विद्यापीठाकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेतल्या. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा संचालक विजय रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. मेळाव्यास डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ.एन.डी. पाटील, डॉ. एस.एस. चव्हाण, अभिजीत मस्कर, पृथ्वीराज सरनाईक यांच्यासह राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांत विविध पदके प्राप्त विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

30 NOV 2021

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा देण्यास प्रयत्नशील

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांचे प्रतिपादन : क्रीडा अधिविभागातर्फे मार्गदर्शन मेळाव्याचे आयोजन

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ सक्षमपणे क्रीडापटूंच्या पाठीशी उभे राहिले तर त्यांच्या गुणवत्तेत व यशामध्ये भरीव वाढ होईल. या अपेक्षेतून विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्याची भूमिका प्रशासनाची आहे. क्रीडापटूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाची क्रीडाकौशल्य विकास आणि करिअरच्या संधी व सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात यासाठी विद्यापीठ सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



**कोल्हापूर : क्रीडा अधिविभागाच्या मेळाव्यात मार्गदर्शन करताना कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. पी. टी. गायकवाड, प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव व डॉ. व्ही. एन. शिंदे.**

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय मेळाव्यामध्ये अध्यक्षस्थानावरुन ते बोलत होते. प्र-कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समितीने भरीव काम केले आहे. खेळाडूंना क्रीडाप्रकारानुसार आहार, प्रशिक्षण, संसाधने, साधने आदी बाबी उपलब्ध करून देण्याचे प्रस्तावित आहे. 'मिशन ऑलिंपिक' हे कायमस्वरुपी लक्ष्य क्रीडापटूंसमोर राहावे. यासंदर्भात विद्यार्थ्यांसमोरील अडचणी दूर करण्यास विद्यापीठ तत्पर आहे. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, चीनबरोबर स्पर्धा करण्यासाठीची आवश्यक कार्यप्रणाली, पायाभूत सुविधा विकसित कराव्या लागतील.

ॲड. धैर्यशील पाटील म्हणाले, खेळाडूंना आवश्यक पायाभूत सुविधा, वैद्यकीय, समुपदेशन, संतुलित आहार आदी सुविधा पुरविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. विद्यापीठाच्या इनडोअर स्टेडियमचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाकडे सादर केला आहे.

संजय जाधव यांचेही भाषण झाले. क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. क्रीडा संचालक विजय रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. एस. एस. चव्हाण, अभिजीत मस्कर उपस्थित होते.

30 NOV 2021

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांसाठी प्रयत्नशील

## कुलगुरू डॉ. शिर्के; क्रीडा विभागातर्फे राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा मेळावा

टेंबलाईवाडी, ता. २९ : 'क्रीडापटूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा क्रीडा कौशल्य विकास आणि करिअरच्या संधी व सुविधा उपलब्ध व्हायला हव्यात. यासाठी विद्यापीठ सर्वोतोपरी प्रयत्नशील आहे,' असे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सांगितले.



शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश मिळविलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय मेळावा झाला. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, तसेच संजय जाधव उपस्थित होते.

प्र-कुलगुरू डॉ. पाटील म्हणाले, "केवळ ऑलिम्पिकसाठी म्हणून मुलांना वयाच्या सातव्या वर्षापासून प्रशिक्षित करणाऱ्या चीनसारख्या देशाशी आपली स्पर्धा आहे. त्यासाठी तशी कार्यप्रणाली, पायाभूत सुविधा आणि तयारी विकसित करावी लागेल." ॲड. पाटील म्हणाले, "खेळाडूंना पायाभूत सुविधा पुरविण्याचा विद्यापीठाचा प्रयत्न आहे. इनडोअर स्टेडिअमचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाकडे सादर केला आहे. उच्च माध्यमिक स्तरावरील खेळाडू विद्यार्थ्यांसाठीही विशेष क्रीडा शिष्यवृत्ती योजना तयार करण्याचे प्रस्तावित आहे."

> **विद्यापीठ सक्षमपणे क्रीडापटूंच्या पाठीशी उभे राहिले तर त्यांच्या गुणवत्तेत व यशामध्ये भरीव वाढ होईल, या अपेक्षेतून विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्याची भूमिका प्रशासनाची आहे. ॲड. पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्या अनुषंगाने अनेक विधायक सूचना केल्या आहेत. 'मिशन ऑलिम्पिक' हे कायमस्वरुपी लक्ष्य क्रीडापटूंसमोर राहावे, या दिशेने विद्यापीठाने लक्ष केंद्रित केले आहे.**
>
> **- डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरू

जाधव म्हणाले, "विद्यापीठात ३०० निवास क्षमतेचे अद्ययावत क्रीडा वसतिगृह मंजूर केले आहे. तोपर्यंत सरावासाठी येणाऱ्या विद्यार्थ्यांची पर्यायी निवास व्यवस्था व प्रशिक्षकाची व्यवस्था करण्यात येत आहे."

क्रीडा-अधिविभाग प्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत केले. क्रीडा संचालक विजय रोकडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. एस. एस. चव्हाण, अभिजित मस्कर, पृथ्वीराज सरनाईक यांच्यासह आफ्रिद मुख्तार आत्तार (जलतरण), ऐश्वर्या भंडारे (मार्शल आर्ट- कराटे), कुणाल दरवान (मल्लखांब), केतन चिंचणे (मल्लखांब), निशा मोळके (मल्लखांब), ऋषिकेश देसाई (कबड्डी), योगेश पाटील (कबड्डी), सानिका सासणे (बॉक्सिंग), विक्रांत मलमे (सिकई मार्शल आर्ट), इंद्रजित फराकटे (ॲथलेटिक्स), श्वेता चिकोडी (ॲथलेटिक्स), भक्ती पोळ (ॲथलेटिक्स), अभिषेक देवकते (ॲथलेटिक्स), ऋषिकेश किरूळकर (ॲथलेटिक्स), उत्तम पाटील (ॲथलेटिक्स), शिवानी बागडी (बास्केटबॉल), सिद्धांत पुजारी (ॲथलेटिक्स), ताहिर मुल्लाणी (ॲथलेटिक्स), विवेक मोरे (ॲथलेटिक्स), सत्यजित पुजारी (ॲथलेटिक्स), शुभम लगड (मल्लखांब) आदी उपस्थित होते.

30 NOV 2021

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठाचे 'मिशन ऑलिम्पिक' लक्ष्य

## डॉ. डी. टी. शिर्के : क्रीडा अधिविभागाचा मेळावा; अडचणी दूर करू

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर** : खेळाडूंना क्रीडा प्रकारानुसार आहार, प्रशिक्षण, संसाधने, साधने आदी बाबी उपलब्ध करून 'मिशन ऑलिम्पिक' हे कायमस्वरूपी लक्ष्य आपल्या क्रीडापटूंसमोर राहावे, या दिशेने शिवाजी विद्यापीठाने लक्ष केंद्रित केले आहे. या संदर्भातील विद्यार्थ्यांसमोरील अडचणी दूर करण्यास विद्यापीठ सदैव तत्पर आहे, अशी ग्वाही कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी येथे दिली.

विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय मेळाव्यामध्ये अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. प्र-कुलगुरु डॉ. पी.एस. पाटील, व्यवस्थापन परिषद सदस्य अॅड. धैर्यशील पाटील, संजय जाधव प्रमुख उपस्थित होते. विद्यापीठ सक्षमपणे क्रीडापटूंच्या पाठीशी उभे राहिले तर त्यांच्या गुणवत्तेत व यशामध्ये भरीव वाढ होईल, या अपेक्षेतून विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्याची भूमिका प्रशासनाची असल्याचे डॉ. शिर्के यांनी सांगितले. आपल्या मातीतल्या तरुणांत क्रीडाकौशल्ये भरपूर आहेत. त्यांना योग्य मार्गदर्शन व प्रशिक्षणाची मात्र नितांत आवश्यकता आहे. यावेळी क्रीडापटूंच्या विद्यापीठाकडून असलेल्या अपेक्षा जाणून घेण्यात आल्या. यावेळी क्रीडा प्रमुख डॉ. पी.टी. गायकवाड, डॉ. बाबासाहेब उलपे, राजेंद्र रायकर, एन. डी. पाटील, एस. एस. चव्हाण, अभिजित मस्कर, पृथ्वीराज सरनाईक उपस्थित होते.

### इनडोअर स्टेडिअमचा प्रस्ताव

विद्यापीठाच्या इनडोअर स्टेडिअमचा प्रस्ताव केंद्रीय मंत्रालयाकडे सादर केला आहे. उच्च-माध्यमिक स्तरावरील खेळाडू विद्यार्थ्यांसाठी विशेष क्रीडा शिष्यवृत्ती योजना तयार करण्याचे प्रस्तावित असल्याचे धैर्यशील पाटील यांनी सांगितले. विद्यापीठात तीनशे निवास क्षमतेचे अद्यावत क्रीडा वसतिगृह मंजूर करण्यात आले असल्याचे संजय जाधव यांनी सांगितले.

30 NOV 2021

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# क्रीडापटूंना आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधांसाठी प्रयत्नशील : कुलगुरू शिर्के

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

क्रीडापटूंमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचा क्रीडा कौशल्य विकास आणि करिअरच्या संधी व सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी शिवाजी विद्यापीठ सर्वतोपरी प्रयत्नशील आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडा अधिविभागातर्फे विद्यापीठ परिक्षेत्रातील राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर यश प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांसाठी आयोजित एकदिवसीय मेळाव्यामध्ये अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठ सक्षमपणे क्रीडापटूंच्या पाठीशी उभे राहिले, तर त्यांच्या गुणवत्तेत व यशामध्ये भरीव वाढ होईल, या अपेक्षेतून विद्यापीठाकडून खेळणाऱ्या विद्यार्थ्यांसमवेत चर्चा करून त्यांच्या समस्या सोडविण्याची भूमिका प्रशासनाची आहे. ॲड. धैर्यशील पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने त्या अनुषंगाने गेल्या काही वर्षांत भरीव काम केले आहे. अनेक विधायक सूचना केल्या आहेत. खेळाडूंना क्रीडा प्रकारानुसार आहार, प्रशिक्षण, संसाधने, साधने आदी बाबी उपलब्ध करून 'मिशन ऑलिंपिक' हे कायमस्वरूपी लक्ष्य आपल्या क्रीडापटूंसमोर राहावे, या दिशेने विद्यापीठाने लक्ष केंद्रित केले आहे.

प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील म्हणाले, केवळ ऑलिंपिकसाठी म्हणून मुलांना वयाच्या सातव्या वर्षापासून प्रशिक्षित करणाऱ्या चीनसारख्या देशाशी आपली स्पर्धा आहे. त्यांच्याशी स्पर्धा करावयाची तर तशी कार्यप्रणाली, पायाभूत सुविधा आणि तयारी विकसित करावी लागेल. ॲड. धैर्यशील पाटील, संजय जाधव यांनी मते मांडली.

क्रीडा अधिविभागप्रमुख डॉ. पी. टी. गायकवाड यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. क्रीडा संचालक विजय रोकडे यांनी सूत्रसंचालन, तर प्रभारी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. मेळाव्यास डॉ. बाबासाहेब उलपे, डॉ. राजेंद्र रायकर, डॉ. एन. डी. पाटील, डॉ. एस. एस. चव्हाण, अभिजित मस्कर, पृथ्वीराज सरनाईक, आफ्रिद अत्तार (जलतरण), ऐश्वर्या भंडारे (मार्शल आर्ट कराटे), कुणाल दरवान (मल्लखांब), केतन चिंचणे (मल्लखांब), निशा मोळके (मल्लखांब), ऋषीकेश देसाई, योगेश पाटील (कबड्डी), सानिका सासने (बॉक्सिंग), विक्रांत मलमे (सिकई मार्शल आर्ट), शिवानी बागडी (बास्केटबॉल), शुभम लगड (मल्लखांब) आणि इंद्रजित फराकटे, श्वेता चिकोडी, भक्ती पोळ, अभिषेक देवकते, ऋषीकेश किरूळकर, उत्तम पाटील, सिद्धांत पुजारी, ताहिर मुल्लाणी, विवेक मोरे आदी उपस्थित होते.

लोकसत्ता

# डॉ. मोहन राजमाने यांना 'गुणवंत प्राचार्य' पुरस्कार



शिवाजी विद्यापीठातर्फे दिला जाणारा गुणवंत प्राचार्य पुरस्कार स्वीकारताना डॉ. मोहन राजमाने. समवेत अन्य मान्यवर.

**कराड :** शिवाजी विद्यापीठाच्या ५९ व्या वर्धापन दिनानिमित्त संलग्न महाविद्यालयातील 'गुणवंत प्राचार्य २०२१' हा पुरस्कार कराडच्या सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन राजमाने यांना प्रदान करण्यात आला. या पुरस्काराबद्दल रयत शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष डॉ. अनिल पाटील, प्रा. डॉ. एन. डी. पाटील आदींनी डॉ. राजमाने यांचे अभिनंदन केले आहे. प्राचार्य डॉ. राजमाने २००६ पासून सद्गुरू गाडगे महाराज महाविद्यालयाचे प्राचार्य आहेत. या महाविद्यालयाची गुणात्मक व संख्यात्मक वाढ करण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले. शिवाजी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील हे ए प्लस मानांकन, ३.६३ गुणांक मिळविणारे पहिले महाविद्यालय असून, आयएसओ प्रमाणित असणारे हे महाविद्यालय २०१९ पासून स्वायत्त करण्यात प्राचार्य डॉ. राजमाने यांची दूरदृष्टी, योगदान आणि प्रचंड मेहनत महत्त्वाची आहे. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराने महाविद्यालयाच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला. डॉ. राजमाने यांनी प्राचार्य केलेल्या कामाची दखल घेऊन शिवाजी विद्यापीठातर्फे हा पुरस्कार देण्यात आला. त्यांनी प्राचार्य म्हणून महाविद्यालयाबद्दल निष्ठा, कार्यतत्परता, उत्कृष्ट अध्यापन व प्रशासन विविध समित्यांवर केलेले प्रतिनिधित्व, तसेच शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रातील बहुमोल योगदान या बाबी विचारात घेऊन त्यांना हा पुरस्कार देण्यात आला.

लोकमत

# 'मराठी कादंबरीचा सप्ताह'चा आज प्रारंभ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग आणि सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखेने 'मराठी कादंबरीचा सप्ताह' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. त्यात आज, मंगळवार ते दि. १० डिसेंबर या कालावधीत सकाळी दहा ते दुपारी एक या वेळेत व्याख्याने मराठी विभागात होणार आहेत. विचारवंत आणि समीक्षक विनय हर्डीकर यांची मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्याने होतील. या उपक्रमाचे उद्घाटन बुधवारी सकाळी अकरा वाजता ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते होणार असल्याची माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली.

लोकमत

# शिवाजी विद्यापीठात मराठी कादंबरीचा सप्ताह

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी कादंबरीचा सप्ताह' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या अंतर्गत विचारवंत व समीक्षक विनय हर्डीकर यांची मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्याने ३० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत आयोजित केली आहेत. ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी सोमवारी दिली.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठात आजपासून मराठी कादंबरीचा सप्ताह

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग व सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी कादंबरीचा सप्ताह' उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होईल. विचारवंत व समीक्षक विनय हर्डीकर यांची मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्याने होणार आहेत. ३० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत सकाळी दहा ते एक वेळेत व्याख्याने मराठी विभागात होतील, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली.

पुढारी

# ‘उद्योगाची नवी कल्पना’वर शिवाजी विद्यापीठात आज स्पर्धा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ कौशल्य व उद्योजकता विकास केंद्र यांच्या वतीने मंगळवारी (दि. ३०) सकाळी ११ वाजता ‘उद्योगाची नवी कल्पना’ या विषयावर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. पदवी व पदव्युत्तर शिक्षण पूर्ण झालेले सर्व विद्यार्थी स्पर्धेसाठी पात्र आहेत. यासाठी नावनोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धकांच्या कल्पनांचे अधिकार अबाधित व गोपनीय ठेवण्यात येतील. स्पर्धेतील तीन विजेत्या स्पर्धकांना रोख रकमेची बक्षिसे दिली जातील. अधिक माहितीसाठी कौशल्य व उद्योजकता विकास केंद्राचे समन्वयक डॉ. ए. एम. गुरव यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पुढारी

# विद्यापीठ दीक्षांत समारंभ; पदवी, पदविका मिळविण्यासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाचा ५८ वा दीक्षांत समारंभ जानेवारी-फेब्रुवारी दरम्यान नियोजित आहे. ऑक्टोबर २०२० व एप्रिल २०२१ सत्र व यापूर्वीच्या अंतिम परीक्षेत उत्तीर्ण व पात्र विद्यार्थ्यांना पदवी, पदविका प्रमाणपत्र मिळविण्यासाठी २९ नोव्हेंबर ते १८ डिसेंबरपर्यंत ऑनलाईन अर्ज करता येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज नियमित व स्वायत्त ऑप्शनमधून भरले आहेत, त्यांना अर्जाची प्रिंट विद्यापीठात जमा करण्याची आवश्यकता नाही. सर्व बी.कॉम., बी.एड. आणि विधी शाखा (लॉ) उत्तीर्ण विद्यार्थ्यांनी संगणक प्रणालीतून अर्ज भरताना मुख्य विषय काळजीपूर्वक, बिनचूक भरणे गरजेचे आहे. एम.फिल, पीएच.डी. व श्रेणीसुधारचे विद्यार्थांनी ऑनलाईन अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे अपलोड करावीत. पीएच.डी.प्राप्त विद्यार्थ्यांचे ५ जानेवारीपर्यंत अर्ज स्वीकारले जातील. दीक्षांत समारंभाची माहिती विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे, अशी माहिती परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक जी. आर. पळसे यांनी दिली.

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठात मराठी कादंबरीचा सप्ताह

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठामध्ये 'मराठी कादंबरीचा सप्ताह' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याअंतर्गत विचारवंत व समीक्षक विनय हर्डीकर यांचे मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्यान होणार आहे. दि. ३० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत सकाळी १० ते दुपारी १ या वेळेत ही व्याख्याने मराठी विभागात आयोजित केली आहेत. ३० नोव्हेंबर रोजी सकाळी ११ वाजता ज्येष्ठ राजकीय विश्लेषक प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्‌घाटन होणार आहे, ही माहिती मराठी विभागप्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली.

सकाळ

# विद्यापीठात मराठी कादंबरीचा सप्ताह

**टेंबलाईवाडी :** शिवाजी विद्यापीठाचा मराठी अधिविभाग आणि सातारा येथील अखिल भारतीय नाट्य परिषद शाखेतर्फे 'मराठी कादंबरीचा सप्ताह' या उपक्रमाचे आयोजन केले आहे. याअंतर्गत विचारवंत आणि समीक्षक विनय हर्डीकर यांची मराठीतील निवडक कादंबऱ्यांवर व्याख्याने होणार आहेत. ३० नोव्हेंबर ते १० डिसेंबर या कालावधीत सकाळी दहा ते एक वेळेत ही व्याख्याने मराठी विभागात आयोजित केली आहेत. ३० तारखेला सकाळी ११ वाजता प्रा. प्रकाश पवार यांच्या हस्ते उद्‌घाटन होईल, अशी माहिती मराठी विभाग प्रमुख प्रा. रणधीर शिंदे यांनी दिली. कार्यक्रमाचे आयोजन मर्यादित लोकांसाठी आहे.